# ठाणे-वाशी रेल्वे स्थानकांमधील समस्या एक महिन्यात दूर करा - खा. डॉ. संजीव नाईक

## प्रत्यक्ष दौरा करून प्रवाशांशी संवाद

नवी मुंबई । प्रतिनिधी

ठाणे-वाशी रेल्वे मार्गावरील रेल्वे स्थानकांची दुरावस्था, भुयारी मार्गाचे डागडुजीकरण, महिलांसाठी सुरक्षा रक्षक नेमणे, तिकीट खिडकी आदी समस्यांची आगामी एका महिन्यात पूर्तता न झाल्यास लोकप्रतिनिधी या नात्याने नागरिकांसमवेत रस्त्यावर उतरू, असा इशारा ठाण्याचे खा. डॉ. संजीव नाईक यांनी आज रेल्वे प्रशासनाला दिला. सिडकोकडून रेल्वे प्रशासनाकडे रेल्वे स्थानक हस्तांतरणाची प्रक्रिया लवकरच पूर्ण होणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

रेल्वे प्रवासी संघटना, लोकप्रतिनिधी, रेल्वे प्रवासी, नागरिक यांनी ठाणे-वाशी मार्गावरील रेल्वेच्याविषयक विविध समस्या काही दिवसापूर्वी खासदारांकडे मांडल्या होत्या. त्यानुसार खा.डॉ. नाईक यांनी लोकप्रतिनिधी, रेल्वे प्रवासी संघटना, रेल्वेचे अधिकारी, सिडकोचे अधिकारी, सफाई विभागाचे प्रमुख, आरपीएफ, रेल्वे पोलीस यांच्यासमवेत आज हार्बर मार्गावरील ऐरोली, रबाळे, घणसोली, तुर्भेया रेल्वे स्थानकाचा पाहणी दौरा केला. तब्बल पाच तास चाललेल्या या दौऱ्यात रेल्वे संघटना, प्रवासी, नागरिक यांनी रेल्वे विषयक लेखी व तोंडी समस्या सादर केल्या.

ऐरोली रेल्वे स्थानकातील पाहणी दौऱ्यात रेल्वे प्रशासनाला काही महिन्यांपूर्वी नागरिकांनी दिलेल्या विविध समस्यांचा रेल्वे प्रशासनाकडून निपटारा न झाल्याबद्दल रेल्वे प्रशासनाला जाब विचारला. रेल्वे स्थानकातील शौचालय, लाईटची व्यवस्था, हायवे लगत स्थानकाच्या प्रवेशद्वारावर तिकीट खिडक्या तसेच तिकीट पंचिंग मशीन बसविणे या प्राथमिक समस्या तात्काळ मार्गी लावण्याच्या सक्त सूचना रेल्वे तसेच सिडकोच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

सिडकोने नवी मुंबईचा विकास करताना प्रत्येक नोडनुसार रेल्वे स्थानके उभारली मात्र या स्थानकांची स्वच्छता आणि अस्तित्व जपण्यास रेल्वे प्रशासन कूचकामी ठरत असल्याबद्दल खासदारांनी नाराजी व्यक्त केली. सिडकोने रेल्वे स्थानके उभारली आहेत. मात्र रेल्वे प्रशासनाकडून येथे अद्ययावत सुविधा पुरविताना 'हस्तांतरण' न झाल्याने अडसर ठरत असून रेल्वे स्थानकांचे रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरण प्रक्रियेची संबंधित अधिकारी आणि रेल्वेमंत्र्यांशी चर्चा झाल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. सिडको आणि रेल्वे प्रशासन यांच्यातील समन्वयाअभावी प्रवाशांना सुविधा मिळत नसून रेल्वे प्रशासनाकडे स्वतंत्र कारभार आल्यास स्थानकांचा झपाट्याने विकास होईल, असा आशावाद व्यक्त केला. रेल्वे स्थानकांमध्ये सफाई कर्मचारी, आरपीएफ व पोलीस अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने निर्माण होणारी अस्वच्छता व सुरक्षाविषयक परिस्थिती पाहता या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची विनंती रेल्वेच्या डीआरएमकडे खा. डॉ. नाईक यांनी केली.

रबाळे, घणसोली, तुर्भेया रेल्वे स्थानकांचाही यावेळी खासदारांनी प्रत्यक्षात नागरिकांशी संवाद साधून आढावा घेतला. रबाळे, घणसोली रेल्वे स्थानकात एमआयडीसीतील कर्मचाऱ्यांसाठी पश्चिम दिशेला स्वतंत्र तिकीट खिडकी तसेच तिकीट मशीन तात्काळ उभारण्याचे आदेश दिले. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी येत्या १५-२० दिवसात या ठिकाणची समस्या मार्गी लावण्याचे खासदारांना सांगितले.

सर्वात जुन्या तुर्भेरेल्वे स्थानकातील हायवेच्या दिशेने असणाऱ्या प्रवेशद्वारावरील दोन आयबीमचे प्लास्टर निघाले आहे. अवघ्या ५-७ वर्षात रेल्वेची ही अवस्था झाल्याबद्दल संताप व्यक्त करत या आयबीमची डागडुजी तात्काळ न घेतल्यास कोणतीही घटना घडल्यास त्यास रेल्वेला धारेवर धरण्याचा इशारा दिला. तुर्भेरेल्वे स्थानक परिसरात सुलभ शौचालय उभारणे, महिला बचत गटाच्या माध्यमातून 'पे ॲन्ड पार्क' उभारणे आदी विषयाचे इस्टिमेट तयार करण्याच्या सूचना

दिल्या.

खा. डॉ. नाईक यांनी सादर केलेल्या विविध नागरिकांच्या समस्या येत्या महिनाभरात टप्प्याने मार्गी लावण्याचे रेल्वेच्यावतीने उपस्थित डिसीएम जगदीश प्रसाद यांनी सांगितले. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या समस्यांची गांभीर्याने दखल घेत पूर्तता न केल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला.

या पाहणी दौऱ्याला नगरसेवक बाळकृष्ण पाटील, संजय पाटील,महादेव थोरात, परिवहन सदस्य उमाकांत नामवाड, शिक्षण मंडळ सदस्य वासुदेव पाटील, ज्येष्ठ नगरसेवक सुरेश कुलकर्णी, स्थायी समिती सभापती रमेश शिंदे, रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष दिनेश पारेख, राष्ट्रवादी युवकचे जिल्हा अध्यक्ष जयेश कोंडे, दिलीप भाटिया, ऐरोली, रबाळे, घणसोली व तुर्भेरेल्वे स्थानकाचे प्रबंधक, सिडकोचे अभियंता मिसाळे आदी मान्यवर उपस्थित होते.